# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 15 January 2026
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १५ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु आहे. सकाळी साडे नऊ वाजेपर्यंत राज्यभरात सुमारे सात टक्के मतदान झालं.

या निवडणुकीमध्ये मोठ्या संख्येनं मतदान करुन आपणही आपल्या शहरांच्या, महानगरांच्या जडणघडणीत योगदान द्यावं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा असं आवाहन राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघामरे यांनी केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्यातल्या जनतेला मतदान करुन कर्तव्याचं पालन करण्याचं आवाहन केलं. नागपूर इथं मतदान केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. एकूण तीन कोटी ४८ लाखांपेक्षा अधिक मतदार, या सर्व उमेदवारांचं राजकीय भवितव्य ठरवणार आहेत.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर शहरात एक हजार २६७ मतदान केंद्र असून, जालना इथं २९१, परभणी इथं ३४१, लातूर ३७५ आणि नांदेड इथं ६०० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. महापालिकांसाठी प्रभागनिहाय मतदानाची ही पहिलीच वेळ आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात शांततेत मतदान सुरु आहे. संवेदनशील मतदान केंद्रावर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरात सकाळी साडे नऊ वाजेपर्यंत सात पूर्णांक सात टक्के मतदान झालं.

****

जालना महापालिकेत साडे ११ वाजेपर्यंत २० पूर्णांक १३ टक्के मतदानाची नोंद झाली. शहरात सकाळी मतदानाला सुरुवात होताच वयोवृद्ध मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असून इतर नागरिकांनीही मतदान करावं, असं आवाहन केलं. जालन्यात मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार आणि जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी शहरातल्या विविध मतदान केंद्रावर जाऊन पाहणी केली.

****

परभणी महानगरपालिकेच्या ६५ जागांसाठी मतदान सुरु असून, थंडीचा प्रभाव कमी असल्यामुळे सकाळपासून मतदारांचा चांगला प्रतिसाद दिसत आहे. या निवडणुकीत ४०१ उमेदवार रिंगणात असून, साडे ११ वाजेपर्यंत २६ पूर्णांक ४४ टक्के मतदान झालं.

परभणी इथं प्रभाग क्रमांक चार मधल्या एका मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि कंट्रोल युनिट मध्ये बिघाड झाल्याने याठिकाणचं मतदान बंद पडलं आहे. प्रशासन पुढील व्यवस्था करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी परभणी शहरातल्या मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजवण्याचं आवाहन केलं.

****

लातूर महापालिकेत साडे अकरा वाजेपर्यंत १८ पूर्णांक २२ टक्के मतदान झालं. तर नांदेड महापालिकेसाठी पहिल्या दोन तासात ३५ हजार ९५१ मतदारांनी मतदान केलं.

****

भारतीय सेना दिनानिमित्त आज देशाच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असलेल्या आपल्या शूर सैनिकांच्या अतुलनीय शौर्याला, शिस्तीला आणि सर्वोच्च बलिदानाला देश नमन करत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातले सर्व सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात, भारतीय सैन्याने आपल्या व्यावसायिकता, शिस्त आणि मानवतावादी सेवेद्वारे जागतिक स्तरावर आदर मिळवला असल्याचं नमूद केलं.

****

लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रिया ही लोकशाहीला स्थिरता, गती आणि व्यापकता देतात असं भारतानं जगाला दाखवून दिलं आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आज दिल्लीत राष्ट्रकुल देशांच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या अठ्ठाविसाव्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारतात संसदेच्या कामकाजात आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या वापराबाबत पंतप्रधानांनी माहिती दिली. ते म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

भारतात लोकशाहीचा अर्थ शेवटच्या व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचवणं हा असून, गेल्या काही वर्षांत देशातले २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले असल्याचं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेत ४२ राष्ट्रकुल राष्ट्रांचे ६१ अध्यक्ष, पीठासीन अधिकार्यांसह, चार अर्धस्वायत्त देशांचे संसद अध्यक्षही सहभागी झाले आहेत.

****

एलोन मस्क यांनी एक्स या समाजमाध्यमावर कृत्रिम बुद्धीमत्ता अर्थात एआयचा वापर करुन तयार केलेल्या आक्षेपार्ह प्रतिमा संपादित करण्यावर प्रतिबंध घातले आहेत. कॅलिफोर्नियाच्या सर्वोच्च अभियोक्त्याने एआयने तयार केलेल्या मुलांच्या अश्लिल प्रतिमेची चौकशी सुरू केल्यानंतर काही तासांतच पेड सबस्क्राइबर्स सह सर्व वापरकर्त्यांना ही बंदी लागू करण्यात आली आहे.

****